# पतसंस्थांना टार्गेट करणे अंगाशी आले

अलीकडच्या काळात नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना सर्व स्थरावरून टार्गेट करण्याचे काम काही विचार न करता नियमितपणे दुष्टचक्र चालू आहे. पूर्ण माहिती न घेता व खातरजमा न करता पतसंस्थांची कोंडी करण्याचे पाप ज्यांनी आरंभिले व त्याला संबंधित यंत्रणेने कृतघ्नपणे साथ दिली व ते एर्न् आता कायदेशीर अडचणीत आलेले आहेत. किंबहुना त्याचे दुष्परिणाम सरकारला भोगावे लागतील. अशी भयंकर परिस्थिती उद्‌भवलेली आहे व त्या गोष्टीबाबत सरकार व सहकार खाते अनाहुतपणे याप्रकरणी अज्ञानी आहे.

०६ ऑक्टोंबर २०१० रोजी राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी एक परिपत्रक काढून हि परिस्थिती तयार केली आहे. या परिपत्रका '' **उणे नक्त मुल्य असणाऱ्या नागरी सहकारी बँकामध्ये रूपये १ लाखापर्यंतच्या ठेवी स्विकारण्याबाबत निर्बंध घालण्याच्या सुचना केल्या आहेत.** '' रिझर्व्ह बँकेचे ठेवीदारांच्या हितसंरक्षणाचे धोरण आणि बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमधील तरतुदी विचारात घेता उणे नक्त मुल्य असणाऱ्या बँका विशेषतः ज्या ठिकाणी तोट्याची रक्कम बँकेच्या स्वनिधीहून जास्त झाल्याने ठेवीदारांना धोका निर्माण झाला आहे. अशा बँकांवर रिझर्व्ह बँकेची कारवाई होण्याची शक्यता विचारात घेता या बँकांमधील ठेवीदारांचे नुकसान होवू नये यासाठी या बँकांना प्रति ठेवीदार **रूपये एक लाखापर्यंतच्याच ठेवी स्विकारण्याबाबत निर्बंध घालणे आवश्यक आहे.** कारण नागरी सहकारी बँकांच्या ठेवींना विमा संरक्षण प्राप्त असल्याने एक लाख रूपये मर्यादेपर्यंतच्या ठेवी सुरक्षित आहेत. व सदरची रक्कम ती बँक अवसायनात गेल्यानंतर विमा कंपनिकडून मिळू शकते. याबाबत शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, रूपये एक लाखावरील ठेवीदार यांना त्यांच्या **एक लाखावरील रक्कम परत मिळण्यासाठी अ्ण्उण ॲक्टमधील तरतुदी विचारात घेता परत मिळण्याची शक्यता कमी होवून ठेवीदारांना नुकसान संभविते.** विशेषतः सध्या ठेवीदारांना एक लाखावरील ठेवी अशा बँकांमध्ये अडकून पडल्यास त्याचा परिणाम संस्थेच्या, ठेवीदारांच्या आर्थिक हितावर होवू शकतो हि बाब विचारात घैता खालीलप्रमाणे परिपत्रकीय सूचना राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी निर्गमित केलेल्या आहेत.

१. उणे नक्त मुल्य असणाऱ्या नागरी सहकारी बँकांनी यापुढे प्रति ठेवीदार एक लाखाच्या मर्यादेपर्यंतच्याच ठेवी स्विकाराव्यात.

२. उणे नक्त मुल्य असणाऱ्या नागरी सहकारी बँकांना **सहकारी संस्थांच्या ठेवी स्विकारता येणार नाहीत.**

३. उणे नक्त मुल्य असणाऱ्या नागरी सहकारी बँकांकडे प्रति ठेवीदार एक लाखाच्या **मर्यादेबाहेर ठेवी असल्यास या ठेवी तातडीने रूपये एक लाखाच्या मर्यादेत आणाव्यात.**

४. उणे नक्त मुल्य असणाऱ्या नागरी बँकांकडे अस्तित्वात असलेल्या रूपये एक लाखांवरील ठेवींचे नुतणीकरण करण्यात येवू नये. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे निर्बंध नसल्यास ठेवी परत करण्यात याव्यात.

५. नागरी सहकारी पतसंस्थांनी त्यांचे निधी गुंतविताना वरील प्रमाणे काळजी घ्यावी.

मा. सहकार आयुक्तांनी आपल्या परिपत्रकात पुढे असेही आदेश दिले आहेत की, ''वरील सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.'' **परिपत्रकातील सुचनांचे पालन न झाल्यास नागरी सहकारी बँकांचे संचालक मंडळ तसेच ठेवीदार संस्थांच्या संचालक मंडळास नुकसानीस जबाबदार धरून कठोर कारवाई करण्यात येईल असे म्हटले आहे.**

वरील परिपत्रकाचा अर्थ अत्यंत स्पष्ट आहे की, **हे परिपत्रक राज्यातील नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांचेबाबतीत असल्याचे जरी परिपत्रकात म्हटले असले तरी मात्र बँकींग रेग्युलेशन ॲक्ट ज्यांना लागू आहे, त्या सर्व बँकांना या परिपत्रकातील सर्व सुचना व आदेश कायद्याने बंधनकारक राहतील असा गर्भित इशारा व निष्कर्ष या परिपत्रकातून बाहेर पडतो.** आणि या परिपत्रकातील सुचना व आदेशांचा उद्देश हा बँकींग रेग्युलेशन ॲक्ट ज्या बँकांना लागू आहे, त्यातील केवळ नागरी सहकारी बँकांसाठीही ''उणे नक्त मुल्य'' संकल्पना लागू होवू शकत नाही. देशाच्या **संविधानाने समानता द्यावर जोर देवून** ज्याच्या-त्याच्या सोयीनुसार वापर या देशात कोणालाही करता येणार नाही. त्यामुळे राज्यातील **जिल्हा मध्यवर्ती बँका व राज्य सहकारी बँक व अन्य** सहकारी बँका मग त्या मल्टीस्टेट को-ऑप. बँका असल्या किंवा राज्यस्तरीय सहकारी बँका असल्या तरी त्यांना राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी काढलेल्या ह्या परिपत्रकामुळे एक नविन व भविष्यात फार मोठी समस्या उभी राहू शकते, असाच या परिपत्रकातून निष्कर्ष निघतो. त्याची गंभीरता ज्यावेळेस जिल्हा बँका, राज्य बँक व इतर सहकारी संस्था यांना आपोआप लागू पडते हे जर संबंधितांना पुर्ण ज्ञात झाले तर **राज्यातील अनेक जिल्हा मध्यवर्ती बँका व राज्यातील सहकाराचे नेतृत्व करणारी राज्य सहकारी बँक ३१ मार्च २०१० अखेर झालेल्या वैधानिक लेखापरिक्षणामध्ये उणे नक्त मुल्य असणाऱ्या बँका आहेत.** आणि यामुळे अशा राज्य सहकारी बँकेत, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी व नागरी सहकारी बँकांनी इतर सहकारी संस्था व ठेवीदारांनी रूपये एक लाखापेक्षा रक्कमेच्या ठेवी ठेवल्या तर संबंधित सहकारी संस्थांवर, जिल्हा सहकारी बँकांवर व राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर मा. सहकार आयुक्त कठोर कारवाई करणार आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. या विषयाच्या गांभिर्याच्या सरकारने व राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी विचार केलेला दिसत नाही व हिच बाब कायदा व न्यायतत्वाला अधिन राहून सर्वांना लागू पडते व **त्याचे दुष्परिणाम राज्यातील अनेक सहकारी संस्था, नागरी सहकारी पतसंस्था, नागरी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका व राज्य सहकारी बँक यांतील संचालक मंडळ निश्चितपणे सहकार आयुक्तांच्या परिपत्रकाने अडचणीत येणार आहे.** त्यामुळे राज्य सरकारच्या या प्रकरणी रिझर्व्ह बँक, नाबार्ड, सहकार आयुक्त, राज्य बँक, जिल्हा बँक, नागरी बँका, पतसंस्था व इतर सहकारी संस्था यांचा या परिपत्रकानुसार ज्याचे उणे नक्त मुल्य आहे. **मग त्यामध्ये नागरी बँक असो, जिल्हा सहकारी बँक असो किंवा राज्य सहकारी बँक असो तेथे रूपये एक लाखाच्या पुढे ठेवी ठेवाव्यात किंवा ठेवू नये व एक लाखाच्या पुढच्या ठेवी यापुढे नुतनीकरण करावे किंवा करु नये,** याचे निर्देश राज्याच्या सहकार आयुक्तांनी त्वरीत देणे आवश्यक आहे. अन्यथा राज्यात याप्रकरणी हाहाकार माजेल व नागरी बँका, जिल्हा बँका व राज्य बँकेचे संचालक मंडळ व ठेवीदार अडचणीत आल्याशिवाय राहणार नाही. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे रिझर्व्ह बँक व नाबार्ड हे राज्याच्या सहकार आयुक्तांच्या या परिपत्रकानुसार कठोर कारवाई केल्याशिवाय राहणार नाही, याकडे मी या अग्रलेखाद्वारे संबंधितांचे लक्ष वेधीत असून त्वरीत योग्य त्या कारवाईची जाहिरपणे मागणी करीत आहे. हे जर संबंधितांनी केले नाही तर

राज्यातील छोटे-मोठे ठेवीदार व सहकारी संस्था यांचे आर्थिक अस्तित्वच धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही व याला सर्वस्वी जबाबदार मा. सहकार आयुक्त व सरकार असेल. परंतु **नागरी सहकारी पतसंस्था यांना टारगेट करण्याचे पाप यामुळे कसे अंगाशी आले व न्यायव्यवस्थेत दुजाभाव केल्यानंतर काय घडू शकते हेच या परिपत्रकामुळे बाहेर पडलेले आहे.**

थोडक्यात पतसंस्थांना एक न्याय व इतर संस्थांना वेगळा न्याय हे शासनाचे धोरण त्यांच्या हळूहळू अंगलट येत आहे व त्याचीच ही फळे भोगावी लागत आहेत. ही बाब अत्यंत दुदैवी आहे आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला खिळखिळी करणारी आहे. ज्यांनी शासनाचे व वित्तीय संस्थांचे विविध प्रकारे व विविध माध्यमातून हजारो करोडो रुपये उकळले म्हणजेच **जनतेच्या पैशाची ज्यांनी लूट केली त्या साखर कारखाने व सूतगिरण्यांना एक न्याय, नांदेड जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेला दुसरा न्याय, राज्यातील इतर जिल्हा मध्यवर्ती बँकांना तिसराच न्याय व राज्यातील पतसंस्थांना वेगळाच न्याय** हे आता लपून राहिलेले नाही व त्याचेच हे फळ आहे. वेळीच संबंधितांलनी दुरुस्त व्हावे व सहकारी संस्थांना समान आर्थिक न्याय, सोयी सवलती, आदेश, परिपत्रके यासाठी कायद्याचा सन्मान करावा हे या निमित्ताने आवाहन करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**